दुरध्वनी क्र:07137-272017
Email ID : dcfwadsa@gmail.com
GSTIN 27AAAGD0578F1ZM

महाराष्ट्र शासन
वनविभाग

# उप वनसंरक्षक वडसा वनविभाग वडसा यांचे कार्यालय

आरमोरी रोड वडसा (देसाईगंज) -४४१२०७ (महाराष्ट्र राज्य)

क्रमांक : कक्ष-३(२)/योजना/ 1662 वडसा दिनांक- 27.02.2026

प्रति,

संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नागपूर- अमरावती विभाग, नागपूर जुने सचिवालय,
ईमारत पहिला माळा,नागपूर

**विषय:- कंत्राटी पध्दतीवर Biologist पदासाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यास पाठविणेबाबत.**

वडसा वनविभाग, वडसा यांचे कार्यक्षेत्रात मानव - वन्यजीव संघर्ष टाळणे, वन्यप्राण्यांचा अभ्यास करणेकरीता कंत्राटी पध्दतीवर प्रशिक्षीत Biologist या पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करावयाची असून त्याचा मजकुर तयार करुन प्रसिध्दीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

| कार्यालयाचे नाव- उपवनसंरक्षक, (प्रा) वडसा वनविभाग, वडसा वनवृत्त - गडचिरोली जि. गडचिरोली | | |
|---|---|---|
| 1. | वृततपत्रात जाहिरात प्रसिध्द करावयाची अंतिम तारिख | दिनांक 04.03.2026 |
| 2. | जाहिरातीचा आकार | 12 से.मी. X 12 से.मी. पेक्षा जास्त नको, यापेक्षा जास्त कॉलम किंवा से.मी. प्रसिध्द झाल्यास आपले वृत्तपत्राचेदेयक पारित होणार नाही, त्याची दक्षता घ्यावी. यार्ची सुचना संपादकास देण्यात यावी. |
| 3. | प्रकाशित करावयाचा प्रकार | प्रादेशिक स्तरीय पातळीवर |
| 4. | जाहिरातीकरीता प्रस्तुत वर्तमान पत्रे | (प्रादेशिक स्तर) एक (मराठी) |
| 5. | जाहिरातीचे देयक कोणास सादर करावयाचे आहे | उपवनसंरक्षक (प्रा) वडसा वनविभाग, वडसा ता. देसाईगंज जि. गडचिरोली पिन -441207 |
| 6. | प्रत्येक वर्तमान पत्रात कितीदा जाहिरात प्रसिध्दी करावयाची आहे. | एकदाच |

(वरुण बी.आर.भावसे)
उपवनसंरक्षक
वडसा वनविभाग वडसा.

प्रतिलीपी :- मुख्य वनसंरक्षक (प्रा) गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.
प्रतिलीपी :- सुचना फलक, विभागीय कार्यालय, वडसा वनविभाग, वडसा
प्रतिलीपी :- http:/WWW.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

दुरध्वनी क्र:07137-272017
Email ID : dcfwadsa@gmail.com
GSTIN 27AAAGD0578F1ZM

महाराष्ट्र शासन
वनविभाग
**उप वनसंरक्षक वडसा वनविभाग वडसा यांचे कार्यालय**
आरमोरी रोड वडसा (देसाईगंज) -४४१२०७ (महाराष्ट्र राज्य)

## जाहिरात

उपवनसंरक्षक (प्रा) वडसा वनविभाग, वडसा अंतर्गत खालील कंत्राटी पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदाची संख्या | मानधन | मुख्यालय | कालावधी | अतिरिक्त पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | Biologist (जिवशास्त्रज्ञ) | ०१ | २५,०००/- | वडसा | ११ महिने | वन्यप्राण्याची Monitoring करणे, Study of Behavioural Pattern करणे, जलद बचाव दल (RRT) चे कामात मदत करणे इत्यादी. |

**शैक्षणिक पात्रता :-**

१. Biologist :- पदवी B.V.Sc./B.Sc.in Zoology

(उमेदवारास वन्यजीव विषयक तांत्रिक कामांचा अनुभव/व्याघ्र संनियंत्रण कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य)

टिप :-

१) वयोमर्यादा :- २५ ते ३८ वर्ष (दि.०१.०१.२०२६ रोजी) (शारिरिक स्वास्थ सुदृढ)

२) सर्व पदांना मराठीचे पुरेसे ज्ञान (वाचन, लिहीणे, बोलणे) आवश्यक आहे.

३) वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या मुख्यालया व्यतिरिक्त निवड झालेल्या उमेदवारास उपवनसंरक्षक (प्रा) वडसा वनविभाग, वडसा यांचे आदेशानुसार त्यांचे कार्यक्षेत्रातील व इतर कोणत्याही ठिकाणी काम करावे लागेल.

४) उपवनसंरक्षक (प्रा) वडसा वनविभाग, वडसा पदभरती (कंत्राटी पध्दतीवर ) मधील पदाकरीता आवेदन ई मेल वर सादर करतेवेळी फक्त आपला बायोडाटा (Resume) व अर्ज (Application) या कार्यालयाचे ई मेल - dcfwadsa@gmail.com वर सादर करावे. वरीलप्रमाणे दर्शविलेल्या शैक्षणिक व अतिरिक्त पात्रता याबाबतचे दस्ताऐवज मुलाखतीचे वेळेस दाखविण्यात यावे. याबाबत नोंद घ्यावी. कोणतेही इतर कागदपत्रे अर्जासोबत जोडू नये.

५) उमेदवार हा कोणत्याही इतर शासकिय, निमशासकिय, अशासकिय संस्था किंवा संघटना यांचा पदाधिकारी असता कामा नये.

६) सदर पदे ही पुर्ण वेळ असल्याने या काळात उमेदवाराला इतरत्र काम/ प्रॅक्टीस करता येणार नाही.

७) सदर पदांचे मुख्यालय वडसा राहणे बंधनकारक असेल.

८) वरील सर्व पदाबाबत संगणकाचे पुरेसे ज्ञान अत्यावश्यक/ आवश्यक आहे.

९) मुलाखतीकरीता येणाऱ्या उमेदवारांना कोणताही भत्ता (TA/DA) लागु राहणार नाही. मुलाखतीची तारीख व वेळ उमेदवारांना वेगळयाने कळविण्यात येईल.

(वरुण बी.आर.भावसे)
उपवनसंरक्षक
वडसा वनविभाग वडसा.

(मराठी) वृत्तपत्रामध्ये दिनांक ०४.०३.२०२६ रोजी प्रकाशित करावयाची जाहिरात

उपवनसंरक्षक (प्रा) वडसा वनविभाग, वडसा जि. गडचिरोली (महाराष्ट्र)
पदभरती (कंत्राटी पध्दतीवर)

वडसा वनविभाग, वडसा यांचे कार्यक्षेत्रात मानव - वन्यजीव संघर्ष टाळणे, वन्यप्राण्यांचा अभ्यास करणेकरीता ११ महिण्याच्या कंत्राटी तत्वावर Biologist प्रत्येकी एक जागा भरावयाची आहे. सदर पदाची पात्रता व इतर तपशिलासाठी दिनांक ०४.०३.२०२५ पासून http:/WWW.mahaforest.gov.in या संकेत स्थळाला भेट द्यावी. तसेच वडसा वनविभागाच्या कार्यालयामधील नोटिस बोर्डावरुन तपशिल प्राप्त करावे. तसेच परिपुर्ण बायोडाटा आणि इतर कागदपत्रे उपनवसंरक्षक (प्रा) वडसा वनविभाग, वडसा ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ यांच्या कार्यालयास पोस्टाने /समक्ष / ईमेल व्दारे (dcfwadsa@gmail.com) दिनांक ११.०३.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्याआधी पाठवावे. प्राथमिक छाननीनंतर योग्य उमेदवारांना मुलाखतीची तारीख व वेळ दुरध्वनी संदेश / पत्र / ई-मेलव्दारे कळविण्यात येईल. तसेच संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

(वरुण बी.आर.भावसे)
उपवनसंरक्षक
वडसा वनविभाग वडसा.

My Computer/Disk(E)/Destop/CC-1 Information/Wildlife Folder Death/CT-1 Tiger/ Add Veterinary Doctor

दुरध्वनी क्र:07137-272017
Email ID : dcfwadsa@gmail.com
GSTIN 27AAAGD0578F1ZM

महाराष्ट्र शासन
वनविभाग
**उप वनसंरक्षक वडसा वनविभाग वडसा यांचे कार्यालय**
आरमोरी रोड वडसा (देसाईगंज) -४४१२०७ (महाराष्ट्र राज्य)

**वडसा वनविभाग, वडसा यांचे कार्यक्षेत्रात मानव - वन्यजीव संघर्ष टाळणे, वन्यप्राण्यांचा अभ्यास करणेकरीता कंत्राटी पध्दतीवर प्रशिक्षीत Biologist यांची नियुक्ती करणेबाबत.**

जाहिरात प्रकाशित क्रमांक - कक्ष- ३(२)/योजना/ 1662 दिनांक 27.02.2026

वडसा वनविभाग, वडसा यांचे कार्यक्षेत्रात मानव - वन्वजीव संघर्ष टाळणे, वन्यप्राण्यांचा अभ्यास करणेकरीता कंत्राटी पध्दतीवर प्रशिक्षीत Biologist यांची नियुक्ती करावयाची आहे. भरतीसाठी ईच्छुक उमेदवारांनी सोबतच्या विहीत नमुन्यातील आपला अर्ज व पत्र व्यवहाराकरीता नमुद पुढील पत्त्यावर दिनांक ११.०३.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावा.

पदाचे नाव :- अ) **Biologist** (जिवशास्त्रज्ञ)
१) मानधन :- अ) **Biologist** (जिवशास्त्रज्ञ) प्रति महा रुपये २५,०००/-
२) **शैक्षणिक पात्रता :-** Biologist :- पदवी B.V.Sc./B.Sc.in Zoology
(उमेदवारास वन्यजीव विषयक तांत्रिक कामांचा अनुभव/व्याघ्र संनियंत्रण कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य)

३) वयोमर्यादा :- २५ ते ३८ वर्ष (शारिरीक स्वास्थ सुदृढ) (दिनांक. ०१.०१.२०२५ रोजी)
४) **निवडीची पध्दत** :- उमेदरावांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ते विहित शौक्षणिक पात्रताचे पुर्तता करतात किंवा कसे याची शहानिशा करण्यांत येईल व तद्नंतर मौखिक परिक्षेव्दारे अंतिम निवड होईल.
५) **उमेदवारांची नियुक्ती पुर्वी ठेवावयाची सुरक्षा ठेव व करारपत्र** :- उमेदवारांचे शासकिय व्यवहाराची जबाबदारी असल्याने नेमणुक देण्यापुर्वी उमेदवाराकडून रु. ५०००/- इतकी सुरक्षा ठेव घेण्यात येईल तसेच रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर उपवनसंरक्षक, (प्रा) वडसा वनविभाग, वडसा यांचे नावे करारपत्र घेण्यात येईल.
६) **नियुक्ती कालावधी :-** करार पध्दतीने ११ महिण्याच्या कालाधीसाठी करण्यात येईल. ११ महिण्यानंतर नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. करार पध्दतीच्या कालावधीत त्यांची कामगिरी समाधानकारक असेल त्यांना पुन्हा ११ महिण्यासाठी कंत्राटी पध्दतीने (On Contract Basis) नेमण्यात येईल. काम समाधानकारक नसेल तर त्यांची सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता केव्हाही समाप्त करण्यात येईल.
७) **पुन:र्नियुक्ती :-** करार पध्दतीतील Biologist (जिवशास्त्रज्ञ) यांचे काम समाधानकारक असल्याबाबत उपवनसंरक्षक (प्रा) वडसा वनविभाग, वडसा यांची खात्री पटल्यानंतर त्यांना पुढील ११ महिण्यासाठी पुन:नियुक्ती देण्यात येईल. त्याबरोबर नविन करारपत्र धेवून त्यांना नविन नियुक्ती देण्यात येईल. त्यासाठी त्यांना नविन निवड प्रक्रीयेतून जाण्याची आवश्यकता नाही. सुरक्षा ठेव प्रथम नियुक्तीच्या वेळेस घेतल्याने पुन्हा सुरक्षा ठेव घेण्यात येणार नाही.
८) **निवडीची कार्यपध्दत :-**
अ) उमदवारांनी ५०/- रुपये रोख भरुन विहित अर्ज या कार्यालयातुन प्रत्यक्ष येवून प्राप्त करावा. भरलेला अर्ज व्यक्तीगत येवून या कार्यालयास सादर करावा. भरलेला अर्ज शिलबंद पाकीटात संबंधीत कर्मचाऱ्यांना सादर करुन पोच पावती प्राप्त करावी.
ब ) उपवनसंरक्षक (प्रा) वडसा वनविभाग, वडसा यांचे नावाचे रु. १००/- चा धनाकर्ष (डी.डी.) अर्जा सोबत सादर करावा.
क) पदासाठी प्राप्त अर्जातुन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यिात येईल.

ड) मुलाखत १०० गुणांची राहील. उमेदवारांचा अनुभव, पदवी परिक्षेतील प्राप्त गुण, वन्यजीव विभागात अनुभव व मुलाखतीचे गुण एकत्रित विचारात घेवून उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार करण्यात येवून यादी कार्यालयाच्य नेटिस बोर्डावर लावण्यांत येईल.

९) समितीने निवड केलेल्या उमेदवारांची निवड यादी १ वर्षापर्यंत ग्राहय राहील.

१०) कंत्राट पध्दतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना वडसा वनविभागाचे कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी काम करावे लागेल.

११) संबंधीत उमेदवारास करारपत्रातुन मुक्त व्हावयाचे असल्यास नियुक्ती प्राधिकाऱ्याला १ महिण्याचे पुर्वी सुचना देणे आवश्यक रहील. उमदवाराने अशी सुचना न देता मानधन तत्वावरील नेमणुक सोडल्यास १ महिण्याच्या मानधनाएवढी रक्कम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे जमा करुन उमेदवारास सेवा मुक्त होता येईल. जर शासनाने इतर विभागाकडून प्रतिनियुक्तीचे पद भरल्यास करार पध्दतीने भरलेल्या उमेदवाराची सेवा आपोआप संपुष्टात येईल.

१२) सदर नेमणुक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे या नेमणुकीव्दारे कर्मचाऱ्यास कुठल्याही सेवा विषयक लाभाचा हक्क राहणार नाही. सेवेत स्थापित्य नविन नेमणुकीच हक्क, रजा नुकसान भरपाई, वैद्यकिय प्रतिपुर्ती इत्यदी सवलती अनुज्ञेय राहणार नाही.

१३) सदर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची राहील.

१४) उमेदवारास संगणकाचे ज्ञान आवश्यक आहे. (MS-CIT) परिक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

१५) अर्ज प्राप्त करावयाचा, सादर करावयाचा पत्ता :-

उपवनसंरक्षक (प्रा) वडसा वनविभाग, वडसा ता. देसाईगंज, जि. गडचिरोली ४४१२०७

१६) निवड प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ. क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज विकण्याचा कालावधी (किंमत रु. ५०/- रोख) | दि. ०४.०३.२०२६ ते ११.०३.२०२६ (कार्यालयीन दिवशी/वेळेत) |
| २ | भरलेले अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि. ०४.०३.२०२६ ते ११.०३.२०२६ (कार्यालयीन दिवशी/वेळेत) |
| ३ | अर्जाची छानणी करणे. | १३.०३.२०२६ |
| ५ | पात्र उमेदवारांची मुलाखात | १६.०३.२०२६ (स.११.०० वाजता) |
| ६ | पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती यादी जाहीर करणे. | १८.०३.२०२६ |

(वरुण बी.आर.भावसे)
उपवनसंरक्षक
वडसा वनविभाग वडसा.